प्रकरण दुसरे :

# मराठी कवितेची वाटचाल व तिच्यातील साठोत्तरी मराठी कवयित्रींचे स्थान

प्रकरण दुसरे :

# मराठी कवितेची वाटचाल व तिच्यातील साठोत्तरी मराठी कवयित्रींचे स्थान

२.१. प्रास्ताविक

२.२. मराठी कवितेची वाटचाल

२.३. मराठी कवितेच्या वाटचालीतील साठोत्तरी मराठी कवयित्रींचे स्थान

२.४. समारोप

२.५. समारोप

२.५. संदर्भ व टीपा

## २.१. प्रास्ताविक:

मराठी साहित्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, लघुनिबंध ह्या वाङ्मयप्रकारांबरोबरच कवितांमधूनही स्त्रियांनी आपले जीवनचित्रण केले आहे. मराठी स्त्रियांची ही लेखनपरंपरा जुनी असून ती समृद्ध व संपन्न आहे. पुरुषाप्रमाणे स्त्रीला अभिव्यक्तीस्वातंत्र्य उपभोगता आले नाही म्हणून स्त्रियांनी कमी लिहिले असले, तरी ते समजण्याजोगे आहे. इंग्रजपूर्व काळाच्या सुमारे साडेपाचशे वर्षे आधीपासून स्त्रिया लिहित आल्या आहेत असे दिसते. इंग्रजी अमदानीमुळे तिला नवे परिमाण लाभले. विकासाच्या प्रक्रिया विशेषत्वाने कृतिशील झाल्या. इंग्रजी राजवट सुरू झाल्यावर नव्या युगाची ही कविता सुरवातीला बऱ्याचअंशी संस्कृत व इंग्रजी कवितांची भाषांतरे अशा स्वरूपाची होती. हळूहळू स्वतंत्र काव्यनिर्मिती होत गेली व आधुनिक काव्याला बाळसे प्राप्त होऊ लागले. स्वत:ला आलेले अनुभव, आपल्या आशा-आकांक्षा स्त्रियांनी काव्यातून व्यक्त केल्या. जात्यावर दळताना, कांडताना, झोपाळ्यावर झोके घेताना त्यांनी कविता गायल्या, त्यांच्या विविध भाव स्थितीचे चित्रण ह्या कवितेतून उमटले आहे. म्हणून मराठी कवितेची वाटचाल व तिच्यातील साठोत्तरी मराठी कवयित्रींचे स्थान तपशिलाने जाणून घेऊ.

## २.२. मराठी कवितेची वाटचाल :

मराठी कवितेची प्रारंभीची वाटचाल महानुभाव, वारकरी, दत्त, समर्थ ह्या पंथामुळे व पंथांचे तत्त्वज्ञान मांडण्याच्या हेतूने झाली. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादी संतांच्या मराठी कवितेने अध्यात्माचे निरूपण केले. समाजातील दांभिक, ढोंगी प्रवृत्ती, अन्याय, अंधश्रद्धा ह्यांच्याबरोबर नीतिविचारही मांडला. विसोबा खेचर, जनाबाई, नरहरी सोनार, सावंता माळी, सेना न्हावी, चोखामेळा, गोरा कुंभार, कान्होपात्रा, निळोबा

इत्यादी ज्ञानेश्वर-नामदेव समकालीन संतकवींनी मराठी कविता समृद्ध व संपन्न केली. पुढे शिवशाहीत व पेशवाईत वामनपंडित, रघुनाथपंडित, श्रीधर, महीपती, मोरोपंत, सामराज इत्यादी पंडितकवींनी आख्याने लिहून रामकृष्णांच्या, कौरवपांडवांच्या रसाळ कथा मराठीत आणल्या. प्राचीन मराठी कविता शिवशाहीपासून विशेषत: पेशवाईपासून लौकिक क्षेत्रात वळली. मराठ्यांचे पराक्रम तिने पोवाड्यांतून गाण्यास सुरूवात केली. लावणीत विरह व स्त्री-पुरुषप्रेम त्यांची लज्जत आली. रंगपंचमी, होळी, दुष्काळ, दरबार, खर्ड्याची लढाई असे ऐहिक वा लौकिक विषय तिला रुचू लागले. राम जोशी, प्रभाकर, अनंत फंदी, परशुराम, होनाची बाळा, सगनभाऊ इत्यादी शाहिरांची काही कवने उल्लेखनीय अशी आहेत.

अव्वल इंग्रजी आमदानीत कवितेची दृष्टी ऐहिक झाली, लौकिक झाली. नव्याने इंग्रजी शिकलेल्या कवींनी इंग्रजी काव्याची भाषांतरे मराठीत केली. खंडकाव्य वर्णनपर कविता, निसर्गवर्णन असे काहीसे नवे रूप ह्या भाषांतरांना होते. भाषांतर व अनुकरण करून मराठी कविता ह्या काळात इंग्रजी वळणावर गेलेली दिसते.

अर्वाचीन मराठी कवितेत निसर्गवर्णन, देशभक्ती, समाजकारण, तत्त्वचिंतन, कौटुंबिक प्रसंग, कवी व कविता, स्त्री-पुरूष प्रेम वात्सल्य इत्यादी विविध विषय, तसेच भावगीत, सुनीत, नाट्यगीत, द्वंद्वगीत असे नवे काव्यप्रकारही युरोपीय काव्याच्या धर्तीवर मराठी काव्यास लाभले. कविता अधिक सोपी, आटोपशीर, प्रासंगिक होत गेली. अर्वाचीन मराठी कवितेचे हे सर्व विशेष प्रथम कृष्णाजी केशव दामले ऊर्फ केशवसुत (सन १८६६-१९०५) त्यांच्या कवितेत दिसत असल्याने त्यांना 'अर्वाचीन मराठी काव्याचे जनक' असे म्हटले जाते. अनेक नव्या जाणिवा व नवे काव्यप्रकार त्यांच्या कवितेत वैपुल्याने दिसू लागले. केशवसुतांचे समकालीन ना. वा. टिळक, वि.ज. करंदीकर, बालकवी, गोविंदाग्रज, नारायण

मुरलीधर गुप्ते ऊर्फ बी इत्यादी कवींनी अर्वाचीन मराठी कवितेच्या विकासास हातभार लावला आहे. वि.दा.सावरकर, चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे, भा. रा. तांबे ह्यांची कविता देशभक्ती, संस्थानी वातावरण, अनुभवांची विविधता आणि कल्पकता ह्यांनी नटलेली आहे. तसेच अर्वाचीन मराठी कवितेच्या विकासात रविकिरण मंडळाचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. कवी माधव जूलियन, गिरीश, यशवंत पेंढकर हे रविकिरण मंडळातील अतिशय लोकप्रिय कवी होते. सार्वजनिकरित्या काव्यगायनाची प्रथा त्याच रविकिरण मंडळाने लोकप्रिय केली. अर्वाचीन महाराष्ट्रात नाशिकचे स्वातंत्र्यशाहीर गोविंद, दुर्गाप्रसाद आत्माराव तिवारी, कवी माधव, सानेगुरुजी, आनंदराव टेकाडे, ना. के. बेहेरे, सेनापती बापट इत्यादी कवींच्याकडून देशभक्तिपर राष्ट्रीय कविता विपुल प्रमाणात निर्माण झाली. राष्ट्रीय कवितेबरोबर केशवकुमार (प्र. के. अत्रे), ना. ग. लिमये, अनंत काणेकर, दत्तू बांदेकर, बाबुलनाथ, बकुलराय, गो. ल. आपटे इत्यादी कवींनी विनोदी व विडंबनात्मक कविता लिहून मराठीचे हे दालन समृद्ध केले. तसेच उल्लेखनीय जानपदगीते ह्याच कालखंडात लिहिली आहेत. अर्वाचीन मराठी कवितेस एकदम नवे वळण देण्याचा प्रयत्न आत्माराम रावजी देशपांडे ऊर्फ अनिल ह्यांनी केला, तर पारंपारिक साचा मोडून नव्या दमाची जिवंत कविता लिहिणारे श्रेष्ठ कवी म्हणजे वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज होत. निखळ सौंदर्याच्या मार्मिक आविष्कारात रमणारे बा. भ. बोरकर आपल्या 'जीवनसंगीत' ह्या कवितासंग्रहाने रसिकांसमोर आले. त्यांची कविता गेयता, कोमलता, माधुर्य व भावुकता ह्यांसाठी प्रसिद्ध आहे.

१९४५ साली नवकाव्याचा उदय झालेला दिसतो. हे काव्य कालदृष्ट्या नवीन आहे म्हणून नव्हे, तर ते प्रकृतीने परंपरागत काव्यापेक्षा अगदी भिन्न असल्यामुळे त्याला नवकाव्य

असे म्हटले जाते. आशय आणि अभिव्यक्ती ह्या दोन्ही अंगांनी हे काव्य अगदी वेगळ्या प्रकारचे आहे. नवकाव्याचे जनक म्हणून बा. सी. मर्ढेकर (सन १९०९-१९५६) ह्यांचे नाव प्रामुख्याने घेतले जात असले, तरी त्यांची सर्व कविता परंपरेपासून वेगळी आहे, असे म्हणता येणार नाही. मर्ढेकरांचा 'शिशिरागम' हा कवितासंग्रह सन १९३९ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यातील कविता जुन्याच वळणाच्या आहेत. 'काही कविता' (१९४७), 'आणि आणखी काही कविता' (१९५१) हे दोन कवितासंग्रह मर्ढेकरांचे प्रसिद्ध झाले आणि त्यांच्या नवकाव्याचे वेगळेपण स्पष्ट झाले. मर्ढेकर इंग्लंडमध्ये गेले आणि तेथील समकालीन कवींचा प्रभाव त्यांच्यावर पडला. दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वत्र वाताहत झाली होती. माणुसकी संपली होती. मनुष्य यंत्राप्रमाणे निर्जीव बनत होता. स्त्रीपुरूषांच्या प्रेमातही मर्ढेकरांना यांत्रिक संभोग दिसू लागला. इंग्लंडमधील समकालीन कवींनी प्रस्थापित रोमँटिसिझम विरुद्ध बंड पुकारलेले त्यांनी पाहिले आणि मर्ढेकरांच्या मनात नवकाव्याचे हे रोपटे रुजले, जिगुप्सा, ग्राम्यता, अश्लीलता, तिरस्कार, अशिष्टता इत्यादींनी मर्ढेकरांचे काव्य ओळखू जाऊ लागले. लिंग, विष्ठा, कृमी, आळ्या, संभोगाची कसरत, हाडांच्या तिरड्या, करपट ढेकर, सुके बोंबिल, मैथुनातील झिंग, बोथटलेली शिळी, सनागरे इत्यादी रूपकांनी मर्ढेकरांची कविता समृद्ध झाली. विडंबनपर कविताही त्यांनी लिहिली आहे. त्यामुळे मर्ढेकरांचे नवकाव्य पुढे अनेकांना अनुकरणीय वाटले, तरी तेही चाकोरीबद्ध, दुर्बोध आणि ग्राम्य झाले. अशा रीतीने मर्ढेकर इंग्लंडमध्ये गेल्यामुळे समकालीन कवींच्या प्रभावामुळे नवकाव्याचे प्रवर्तक ठरले. मर्ढेकरांचे अनुकरण करणारे अनेक नवकवी निघाले. ज्यामध्ये प्रामुख्याने य. द. भावे, वसंत हजरनीस, तसेच नवकाव्याच्या परंपरेतील एक मोठे कवी म्हणजे शरच्चंद्र मुक्तीबोध होत. त्यांचा 'नवी मळवाट' (१९४९) हा कवितासंग्रह मानवतेचा उद्‌घोष विषमतेची चीड, संघर्ष इत्यादींचे चित्रण करताना दिसतो. त्यांच्या 'यात्रिक' (१९५७) ह्या कवितासंग्रहातून यात्रिकमार्ग

स्पष्टपणे दिसतो. मनमोहन नातू, विंदा करंदीकर, पु.शि. रेगे, सदानंद रेगे, वसंत बापट व मंगेश पाडगावर हे सर्व ह्या कालखंडातील लक्षणीय कवी आहेत. मराठी कवितेच्या वाटचालीत मराठी कवींच्याबरोबर मराठी कवयित्रींचे कवितालेखन उल्लेखनीय असे आहे. म्हणून आपण ते तपशीलाने जाणून घेऊ.

महानुभाव पंथातील महदाईसा ऊर्फ महदंबा, हिराइसा, कमळाइसा, पोमाइसा, ध्यानाइसा, ह्या कवयित्री उल्लेखनीय आहेत. वारकरी संप्रदायातील मुक्ताबाई, जनाबाई, आऊबाई, लिंबाई, लाडाई, सोयराबाई, निर्मला, भागू, कान्होपात्रा, बहिणाबाई, तसेच समर्थ संप्रदायातील वेणाबाई, प्रेमाबाई, बयाबाई ह्या कवयित्रींची नावे नोंदवली जातात. ह्याशिवाय अंबाबाई, गंगाबाई ऊर्फ गुप्तनाथ, कर्माबाई, विठाबाई, राधाबाई, चिमा, जानकी, पार्वतीबाई, रेणुका मैना, लक्ष्मी, मुक्ताई, संतुबाई अशी आणखीही नावे आढळतात.''१ ह्या सर्व कवयित्रींची रचना मूलत: अध्यात्मपर, भक्तिपर असली तरी लौकिक जीवनाचे व मानवी भावनांचे रंगरूप तिच्यातून प्रतिबिंबित झाले आहेत. सांप्रदायिक अनुयायांना उपदेश, देवाशी केलेले संवादात्मक भांडण आणि भक्तीची वाट चालणाऱ्यांची अधिकारवाणीने केलेली कान उघडणी, ह्यासारखी वैशिष्ट्ये त्यांच्या काव्यात आहेत. सोयराबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई व वेणाबाई ह्यांच्या रचनांमधून समकालीन वातावरणातील ताण सहजपणे प्रत्ययाला येतो. अध्यात्माच्या मार्गात 'स्त्री-जन्मा'चा अडसर झाल्याची खंत व्यक्त होते आणि म्हणूनच 'स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास' अशी स्वत:ची व अन्यस्त्रियांचीही जनाबाई समजूत काढते.

मराठीत काव्यरचना करण्याचा पहिला मान कवयित्री म्हणून महदंबेस द्यावा लागतो. 'धवळे' हे कथाकाव्य, 'मातृकी रुक्मिणीस्वयंवर', 'गर्भकांड ओव्या', काही स्फुट रचना,

ओव्या, आरत्या तिने लिहिल्या. तिच्या काव्याचा विषय श्रीकृष्ण व चक्रधरस्वामी हे होते. महदंबेच्या काव्याचा विशेष म्हणजे या रचना स्वयंस्फूर्त आहेत.

संतशिरोमणी ज्ञानदेवांची धाकटी व एकुलती एक बहिण म्हणजे मुक्ताबाई (जन्म इ.स. १२७९, मृत्यू इ.स. १२९७) अवघ्या एकोणीस वर्षांच्या, आईबापाविना पोरक्या मुक्ताबाईला लहानपणीच कर्त्या स्त्रीची जाणीव झाली असावी. मुक्ताबाईची काव्यरचना संख्येच्या दृष्टीने थोडी आहे. एकूण ४२ अभंग तिच्या नावावर आढळतात. निवृत्तीनाथ व ज्ञानेश्वर ह्यांचा ठसा मुक्ताबाईच्या काव्यावर आढळतो. नामस्मरण महंती हरिपाठाच्या अभंगात तिने गायली आहे, तर समाजनिंदेने व्यथित झालेले ज्ञानेश्वर झोपडीचे दार बंद करून स्वत:ला कोंडून घेतात, तेव्हा ज्ञानेश्वरासारख्या असामान्य योगी व संताची 'ताटीच्या अभंगातून ती समजूत घालते.

संत नामदेवांची शिष्या व दासी असा जनाबाईचा उल्लेख केला जातो. जनाबाई (जन्म इ.स. १३५० हिच्या नावावर 'नामदेवगाथ्या'त ३९४ अभंगांची नोंद आहेत. अभंगामध्ये विषयांची विविधता आहे. तिच्या रचनेत उत्कट भक्तिभावाबरोबरच स्त्रीसुलभ भावभावनांचाही आविष्कार झाला आहे. आपले स्त्रीपण आणि दासीपण नीट लक्षात घेऊनच आपल्या आध्यात्मिक अनुभूतींना ती सामोरी जाते. ह्यामुळे तिच्या अभंगांना मराठी अभंगविश्वात स्वत:चा वेगळा ठसा आहे.

चोखोबांची पत्नी सोयराबाई हिने आपले आध्यात्मिक अनुभव अभंगबद्ध केले. 'संकल संत गाथ्या'त तिच्या नावावर ६२ अभंग आढळतात. आपल्या अभंगामध्ये विठ्ठल भक्तीबरोबर हीन जातीचे दु:खही तिने व्यक्त केले आहे. तिच्या अभंगामध्ये आध्यात्मिक आणि सामाजिक अशी दोन्ही प्रकारची तळमळ दिसून येते.

निर्मळा ही चोखोबांची बहीण 'सकलसंतगाथ्या'त तिच्या नावावर २४ अभंग आहेत. तिच्या अभंगातून आध्यात्मिक तळमळ, चोखोबांचे जीवनचरित्र, तसेच हीन जातीचे दु:ख व्यक्त झाले आहे.

कान्होपात्रा ही मंगळवेढ्याच्या श्यामा गणिकेची कन्या ही पंधराव्या शतकातील होय. आपल्या आईचा वेश्याव्यवसाय पाहून तिला त्या व्यवसायाची किळस आली व काही झाले तरी आपला देह पातक्यांच्या स्वाधीन करून विटाळू द्यावयाचा नाही, असा निश्चय तिने वयाच्या पंधराव्या वर्षीच केला. त्यानंतर पंढरपूरला जाऊन ती विठ्ठलभक्ती करू लागली. तिच्या सौंदर्याची ख्याती ऐकून बिदरच्या बादशहाने तिला आणण्यासाठी डोली पाठविली. देवदर्शनासाठी ती गाभाऱ्यात गेली आणि आपले संरक्षण करण्यासाठी तिने देवाचा धावा केला. शेवटी तिने देवाला आपला प्राण अर्पण केला. 'सकलसंतगाथ्या'त तिचे २३ अभंग आहेत. साध्या, सोप्या आणि अनलंकृत भाषेत तिने आपले अंत:करण उघडे केले आहे. विठ्ठलभेटीची तळमळ हा तिच्या अभंगांचा गाभा आहे.

वेणाबाई ही कोल्हापूरच्या गोपाजीपंत देशपाडे ह्या देशस्त ब्राह्मणाची कन्या होय. (जन्म : सुमारे इ.स. १६२७, समाधी इ.स. १६७८). लहानपणीच तिला वैधव्य आले. ऊर्वरित जीवन ती परमाथति घालवू लागली. तुळशी वृंदावनाजवळ 'एकनाथी भागवता'चे वाचन करत असताना तिची रामदासांशी भेट झाली. रामदासांच्या बोलण्याचा प्रभाव पडल्यामुळे ती त्यांची शिष्या बनली. वेणाबाईने 'रामायण', 'सीतास्वयंवर', 'सिंहासन उपदेश रहस्य', 'श्रीरामगृहकसंवाद', आरत्या व अभंगरचना केली.

बहिणाबाई ही एक अद्वितीय तुकाराम शिष्या कवयित्री आहे. (जन्म : इ.स. १६२८, मृत्यू : इ.स. १७००). वयाच्या तिसऱ्या वर्षी एकवीस वर्षे वयाच्या रत्नाकर पाठक ह्या

बिजवराशी तिचा विवाह झाला. तिच्या नावावर ७२८ अभंग आढळतात. त्यांचे आत्मनिवेदनपर अभंग व निर्याणपर अभंग असे दोन भाग पडतात. आत्मनिवेदनपर अभंगामध्ये आपल्या जन्मापासून देहू सोडेपर्यंत वृत्तांत आलेला आहे. निर्याणपर अभंगात आपला मृत्युकाळ अगोदर कळल्याचे ती सांगते. ह्याशिवाय श्लोक, आरत्या, अशी वेगवेगळी रचना तिने केली आहे. बहिणाबाई आपल्या अभंगात एकीकडे वैवाहिक जीवन जाचक कसे असते, हे सांगते आणि दुसरीकडे पतिविरहित जीवन निरर्थक कसे असते, हेही सांगते. त्यामुळे मनोमनी संसारात राहून देवाची भक्ती करताना बहिणाबाईला फार यातना झाल्याचे दिसते. आपल्या अभंगातून स्त्रीजातीचे दु:ख तिने व्यक्त केले. त्याचबरोबर पतीची सेवा करणे, हा स्त्रीचा धर्म आहे ह्यामुळे दोन्ही कुळांचा उद्धार होतो, असे बहिणाबाईना वाटते.

थोडक्यात एकूण संस्कृत काव्यात असणारा आत्मनिवेदनाचा अभाव वरील सर्व संतकवयित्रींनी दूर केला. पहिल्या दर्जाची भावगीत परंपरा त्यांनी मराठीत रुजविली. भावनेची उत्कटता, जीवनाचा अविष्कार ह्या दृष्टीने ह्या संतकवयित्रींची कविता महत्त्वाची आहे. आपल्या मनात दाटून आलेला भक्तीभाव त्यांनी आपल्या कवितेतून व्यक्त केला. मध्ययुगीन मराठी कवितेच्या जवळजवळ सातशे वर्षांच्या ह्या कालखंडशत पारमार्थिक तळमळ व्यक्त करणाऱ्या स्त्रियांची संख्या कमी असली तरी त्यांची कविता 'प्रकृती'ने वेगळी आहे. पारमार्थाच्या वाटेवर प्रवास करणाऱ्या ह्या स्त्रिया स्वत:च्या अनुभवाशी अतिशय प्रामाणिक आहेत. त्यातून स्त्रीजीवनाचा रम्य आविष्कार त्यांनी घडविला आहे. संसार हेच स्त्रीचे सर्वस्व. त्यामुळे परमेश्वराचे चित्रही त्यांनी प्रापंचिक म्हणूनच रेखाटले आहे. परमेश्वर त्यांनी

कधी आईच्या, कधी पतीच्या, तर कधी बालकाच्या रूपात पाहिला. आत्मानंद, परमानंद, ब्रह्मसुखाच्या दिशेने झेपावणाऱ्या त्यांच्या ह्या कवितेचा घाट मन प्रसन्न करणारा आहे.

इ.स. १८१८ साली पेशवाई संपुष्टात येऊन इंग्रजी राजवट सुरू झाली. इंग्रजांच्या आमदानीत इंग्रजी विद्येचे अध्ययन सुरू झाले. विज्ञाननिष्ठेचा, धर्मभावनेचा काव्यांचा नव्याने आविष्कार झाला. केशवसुतांनी मराठी काव्यसृष्टीला नवी दृष्टी दिली. 'माणूस' हा समाजव्यवहाराचा केंद्रबिंदू बनला. म्हणून माणूस आणि ईश्वरी सत्ता, माणूस आणि निसर्ग, माणूस आणि समाज, माणूस आणि माणूस ह्यांच्यातील परस्परसंबंधाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न मराठी कविता करू लागली. मराठी कवितेत जी वृत्यंतरे व स्थित्यंतरे झाली, त्यांचे पडसाद स्त्रियांच्या काव्यावर मात्र फारसे उमटले नाहीत. मूळ प्रवाहापासून स्त्रियांची कविता दूर राहिली. नवशिक्षणाचा वारा स्त्रियांना फारसा लागला नाही. घरच्या चार भिंतीत कोंडलेल्या स्त्रीला देवदेवतांची गाणी गाण्यात समाधान वाटत होते. ह्या काळात स्त्रियांचे पुढील कवितासंग्रह आढळतात. पार्वतीबाई गोखले - 'स्त्रीगीतरत्नाकर' (१९०३), गंगाबाई विजापूरकर - 'सावित्रीचे गाणे' (१९१३), सरस्वतीबाई टिपणीस - 'अंतर्गृहातील गीते' (१९१५) इ. घराच्या चार भिंतीच्या बाहेर जग आहे आणि त्या जगाचाच आपण एक घटक आहोत, ह्याचा विचार ह्या काळातील स्त्री करू शकत नव्हती, असे वरील काव्यसंग्रहांवरून दिसते. पती हाच तिच्या चिंतनाचा विषय होता. त्याचबरोबर देवदेवतांचे पूजन, परमेश्वरलीला वर्णन, हळदीकुंकू कार्यक्रम ह्यापेक्षा वेगळा भाव कवितेतून आढळत नाही. व्रत-वैकल्ये, नवस-सायास, उपास-तापास आणि जुन्या जळमटांनीच तिचे जग भरले होते.

अर्वाचीन कालखंडातील लक्ष वेधून घेणारी कवयित्री म्हणजे सावित्रीबाई फुले (जन्म : इ.स. १८३१, मृत्यू : इ.स. १८९७) होय. त्यांच्या कार्याबाबत व साहित्याबाबत अनेक

मतमतांतरे आहेत. तत्कालीन समाजाने फुल्यांच्या कार्याची उपेक्षा केली. तीच उपेक्षा सावित्रीबाईंच्याही वाट्याला आलेली दिसते. त्यामुळेच कवयित्री म्हणून त्यांचा उल्लेख मराठी साहित्यात सर्वत्र आढळत नाही. 'भारतातील पहिल्या शिक्षिका, स्त्रीमुक्ती चळवळीच्या पहिल्या नेत्या, पददलितांच्या कैवारी व प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या म्हणून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले ह्यांचे स्थान अढळ आहे.

सावित्रीबाईंच्या नावावर 'काव्यफुले' (१८५४) व 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' (१८९१) हे दोन कवितासंग्रह आढळतात. 'काव्यफुले' ह्या संग्रहात ४१ कविता असून त्यातील १२ कविता मोडी लिपीत आहेत. ह्या संग्रहामध्ये निसर्गविषयक सामाजिक, ईशस्तवनपर, आत्मपर, बोधपर, इतिहासविषयक व इतर स्फूट कविता आहेत. निसर्गविषयक कवितांमधून सावित्रीबाईंचे निसर्गप्रेम व्यक्त झाले आहे. सावित्रीबाईंच्या सामाजिक कविता संख्येने अधिक असून त्यांचे स्वरूप उपदेशाचे आहे. समाजजागृती करणे, हा हेतू ह्या काव्यरचनेमागे दिसतो.

सावित्रीबाईंच्या काव्यविषयक कवितांमधून कवीविषयीचे व काव्यविषयीचे त्यांचे पुरोगामी विचार दिसतात. इंग्रजांनी स्त्रीशूद्रांसाठी केलेल्या कार्याचा उमाळा त्यांच्या कवितेतून व्यक्त झाला असून इंग्रजांची मुक्तकंठाने त्यांनी स्तुती केली आहे. आत्मपर कवितांमध्ये संत बहिणाबाईप्रमाणे स्वत:च्या जन्मगावची व घराण्याची माहिती त्यांनी दिली आहे.

'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' ह्या दुसऱ्या कवितासंग्रहाची रचना त्यांनी म. फुल्यांच्या मृत्यूनंतर केली आहे. ह्या काव्यसंग्रहात ५२ कडवी असून जोतिरावांच्या समाजकार्याचा हयात गौरव केला आहे. जोतिरावांच्या प्रेरणेमुळे आपण काव्य करू शकलो, अशी विनयशील वृत्तीही त्यांनी व्यक्त केली आहे.

ह्या कालखंडातील उल्लेखनीय कवयित्री म्हणजे लक्ष्मीबाई टिळक (जन्म : इ.स. १८७३, मृत्यू इ.स. १९३६) वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह नारायण वामन टिळक ह्या जातिवंत कवीशी झाला. इ.स. १८९४ मध्ये ना. वा. टिळक ख्रिस्ती होणार, ह्या बातमीने त्या अस्वस्थ झाल्या. इ.स. १८९५ मध्ये टिळकांनी धर्मांतर केले. लक्ष्मीबाईचे मन ह्या घटनेने व्यथित झाले. ह्या कवितेला त्यांनी 'दुतिका' संबोधले. पतिविरहामुळे कविता हाच त्यांचा विसावा झाला. आपल्या व्यथांना त्यांनी कवितेतून आकार दिला.

लक्ष्मीबाईनी इ.स. १९०० मध्ये धर्मांतर केले. त्यानंतर त्यांना वाटले की, कविता आपल्याला सोडून गेली. पण तसे झाले नाही. टिळकांच्या सहवासात ती पुन्हा पावलवली आणि टिळकांच्या मृत्यूनंतर तिने वेगवेगळी रूपे घेतली. पतीविषयी प्रेमाची भावना स्त्रीगीतांमधून आढळते. पण पतीला 'मित्र' असे मोकळेपणाने उघडपणे लक्ष्मीबाईंनी म्हटले.

स्त्रीजीवनाचे अनेक पदर त्यांच्या कवितांमधून हळूवारपणे उलगडले आहेत. लक्ष्मीबाईंच्या कविता थोड्याच, पण सुबोध आहेत. घरसंसाराच्या कवितेतून त्यांचे वात्सल्यपूर्ण व विनोदप्रिय व्यक्तिमत्त्व दिसून येते. त्यांचा 'भरली घागर' हा काव्यसंग्रह घरगुती व प्रसन्न भावांनी भरलेला आहे. 'ख्रिस्तायन' ह्या टिळकांच्या अपूर्ण ग्रंथाचे बारा ते पंचाहत्तर पर्यंतचे अध्याय त्यांनी पतिनिष्ठेतून पूर्ण केले. एवढी दीर्घ आख्यान रचना आधुनिक मराठीत दुसऱ्या कोणत्याही कवयित्रीने केली नाही.

मनोरमाबाई रानडे (जन्म : इ.स. १८९६, मृत्यू : इ.स. १९२६) ह्यांचा उल्लेख करणे अपरिहार्य आहे. कवितेचा आस्वाद घेणारी आणि कवितेची चिकित्सा परखडपणे करणारी स्त्री म्हणूनही त्यांचा विचार करणे आवश्यक आहे. मनोरमाबाईंनी ९२ कविता लिहिल्या.

मनोरमाबाईंच्या मृत्यूनंतर 'श्री-मनोरमा' (१९३९) ह्या कवितासंग्रहांमधून त्यांची कविता लोकांसमोर आली.

ज्या काळात स्त्रीने शिकणे, हा गुन्हा मानला जात होता; त्या काळात मनोरमाबाईंनी शिक्षणाबरोबरच नोकरी आणि काव्यलेखन केले. मनोरमाबाईंच्या कवितेतून उत्कट पतिप्रेम व्यक्त झाले आहे.

बहिणाबाई चौधरी म्हणजे खानदेशातील एका शेतकरी कुटुंबातील निरक्षर स्त्री (जन्म : इ.स. १८८०, मृत्यू : इ.स. १९५१). जात्यावर दळता-दळता, शेतावर काम करता-करता तिने आपल्या बोलीभाषेत 'संसाराची गाणी' गायली. ह्या गाण्यातून जिवंत जिव्हाळ्याचे आणि अलौकिक प्रतिभेचे काव्य प्रकटले.

बहिणाबाईंच्या कविता म्हणजे त्यांच्या मनाने स्वत:शीच केलेला संवाद होय. परमार्थ जीवनातील प्रवासाचे, विविध भाव-भावनांचे, विविध विचारच्छटांचे, तसेच प्रासंगिक अनुभूतीचे दर्शन त्यांची कविता घडवते.

लक्ष्मीबाई टिळक व बहिणाबाई चौधरी ह्या दोघींविषयी रा. ग. जाधव म्हणतात, ''स्त्रीची प्रापंचिक भूमिका हीच १९५० पर्यंतच्या म्हणून लक्ष्मीबाई-बहिणाबाईंच्या कवितेचे मुख्य आशयसूत्र होते. या प्रापंचिक स्त्रीभूमिकांचे सांस्कृतिक अधिष्ठान लक्ष्मीबाईंच्या कवितातून सूचित होते, तर त्या भूमिकेचे नैसर्गिक किंवा प्राकृतिक भान बहिणाबाईंना होते. अस्सल देशी भाषेतून लक्ष्मीबाई व बहिणाबाई यांनी काव्यलेखन केले आहे.''[३]

नंतरच्या काळात संजीवनी मराठे (जन्म : इ.स. १९१६, मृत्यू : इ.स. २०००) ह्यांनी विपुल कवितालेखन करून लोकप्रियता व कौतुक मिळवले. त्यांचे काव्यसंग्रह असे : 'काव्यसंजीवनी' (१९३२), 'राका' (१९३८), 'संसार' (१९४३), 'छाया' (१९४९),

'चित्रा' (१९५७), 'चंद्रकूल' (१९७०), 'मी दिवाणी' (१९८१), 'आत्मीय' (१९९४) ह्या कवितेतून प्रीतीसाफल्याची स्वप्ने जपणारी, सहवाससुखाला आसुसलेली स्त्री दिसते. प्रेयसी व पत्नी ही भूमिका नीट बजावणारी स्त्री त्यांना अधिक प्रिय असल्याचे त्यांच्या कवितेतून दिसून येते.

संजीवनीबाईंची सामाजिक जाणीव 'संसार' ह्या कवितासंग्रहात थोड्याफार प्रमाणात व्यक्त झाली आहे. स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव आजच्या स्त्रीस होऊ लागली आहे, ह्याचे प्रत्यंतर त्यांच्या पुढील ओळीतून होते,

"मी कांता, मी माता, शिक्षक मी, सेवक मी,
कलावती, शास्त्रज्ञ, विधीगुणी नसे मी,
विश्वाची मी जणू समूर्त स्त्री माझे नाव असे"[४]

स्त्रीच्या विविध भूमिका आत्मविश्वासाने येथे मांडल्याचे दिसते. शांता शेळके (जन्म : इ.स. १९२१, मृत्यु : इ.स. २००२) त्यांनी भरपूर काव्यलेखन केले आहे. त्यांचे कवितासंग्रह पुढीलप्रमाणे :

'वर्षा' (१९४७), 'रूपसी' (१९५६), 'तोच चंद्रमा' (१९७३), 'गोंदणं' (१९७५), 'जन्मजान्हवी' (१९९०), 'पूर्वसंध्या' (१९९६).

मराठी वाङ्मयात 'कोळीगीते' या गीतप्रकारास पुनरूज्जीत करण्याचे श्रेय शांताबाईंकडे जाते. ३०० वर्षांची परंपरा असणारा 'लावणी' प्रकार शांताबाईंनी चित्रपटगीतांसाठी हाताळला. मराठीतील पहिली स्त्री 'लावणीकार' असा बहुमान पटकावला. शांताबाईंनी काही नाट्यगीते लिहिली. शांताबाईविषयी थोडक्यात असे म्हणता येईल की,

त्यांनी अनेक वर्षे सातत्याने काव्यलेखन करून मराठी कवितेला स्वत:च्या भावविश्वात गुंतवून ठेवले.

इंदिरा संत (जन्म : इ.स. १९१४, मृत्यु : इ.स. २०००) यांनी सर्वात जास्त काव्यलेखन केले. निसर्गात रमलेली वृत्ती आणि तीव्र संवेदना ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये होत. इंदिरा संतांचे काव्यसंग्रह पुढीलप्रमाणे - 'मृण्मयी' (१९८१), 'चित्कळा' (१९८९), 'गर्भरेशीम' (१९९०), 'वंशकुसुम' (१९९४), 'शेला' (१९५१), 'मेंदी' (१९५५), 'मृगजळ' (१९५७), 'रंगबावरी' (१९६४), 'बाहुल्या' (१९७२).

पतिसहवासाची अपेक्षा हे त्यांच्या पहिल्या 'सहवास' संग्रहातील कवितेचे स्फूर्तिस्थान, तर पतिविरहाचे दु:ख हा नंतरच्या संग्रहातील मुख्यप्रेरक भाव आहे. पतीचा विरह हा त्यांच्या बहुतांश कवितांचा विषय आहे.

इंदिरा संतांच्या कवितेची महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे अनुभवविश्व सतत बदलत गेले. प्रीती, निसर्ग, स्वताचे दु:ख ह्यांच्यापलिकडचे दु:ख डोळ्यांनी पहात असूनही कवितेत त्यांना स्थान देता आले नसल्याची खंत त्यांना वाटते. व्यापक दृष्टी आपल्यात नाही अशी प्रांजळ कबुली इंदिराबाईंनी दिली आहे. आपल्या मर्यादांची जाणीवच ह्यातून व्यक्त केली आहे.

पद्मा गोळे (जन्म : १९१३) ह्यांनी काव्यलेखनाला शालेय जीवनापासून सुरूवात केली. त्यांच्या नावावर 'प्रीतिपथावर' (१९४७), 'निहार' (१९५४), 'स्वप्नजा'(१९६२), 'आकाशवेडी' (१९६८), 'श्रावणमेध' (१९८८) हे कवितासंग्रह आहेत. पद्मा गोळे ह्यांच्या कवितांचे संवेदन त्यांच्या काळाशी बांधलेले आहे. कन्या, माता, बहीण, पत्नी, प्रेयसी, सासू आणि आई अशा विविध भूमिकांमधून त्यांची कविता रसिकांना मोह घालत राहिल्याचे

दिसते. ह्या ओळींमधून स्त्रीच्या पुरोगामी गृहजीवनाबद्दलचे विचार व्यक्त झाले आहेत. स्त्री विषयीच्या समाजातील काही विचार प्रवृत्तींचा त्यांनी निषेध केला आहे. तो असा :

''नाही मी हो नुसती नार।
पैजेसाठी जी लाचार
शेजेसाठी आसुसणार
नाही मी हो नुसती मादी।
मी माणुस - माणुस आधी ।।

स्वातंत्र्याबरोबरच माणूसपणाचा हक्क स्त्रीला मिळालाच पाहिजे, हा अट्टाहासही येथे दिसतो. आपल्या कवितेतून त्यांनी अवघ्या स्त्रीजगताची व्यथा मांडली आहे. ह्या कवितेमधून कवयित्रींच्या चिंतनशील व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय येतो. माणसाच्या वागण्याबोलण्यातील विसंगती व सामाजिक वास्तव येथे सांगितले आहे. स्त्रीला माणूस म्हणून जेव्हा वागणूक मिळेल, तेव्हा त्यातून खरे सुख निर्माण होईल, सगळा झगडा संपेल, असे त्यांना म्हणावयाचे आहे.

शिरीष पै यांच्या नावावर 'पायवाट' (१९८५), 'हायकू' (१९८६), 'ऋतुचित्रे' (१९८८), 'चंद्र मावळताना' इ. कवितासंग्रहापैकी 'हायकू' हा काव्यसंग्रह लक्षणीय आहे. ह्या संग्रहात स्वतंत्र व अनुवादित हायकू आहेत. 'हायकू' हा जपानी काव्यप्रकार त्यांनी अतिशय प्रभावीपणे हाताळला. 'हायकू' हा प्रकार त्यांच्या आत्म्यानिशी मराठी कवितेच्या भूमीत रुजविण्याचे श्रेय शिरीष पै ह्यांना द्यायलाच हवे असे दत्तात्रय पुंडे मत व्यक्त करतात.[५]

## २.३. मराठी कवितेच्या वाटचालीतील साठोत्तरी मराठी कवयित्रींचे स्थान :

१९६० पूर्व काळात कवितेत, किंबहुना साहित्याच्या सर्वच क्षेत्रांमध्ये उच्चवर्णीय स्त्रियांचे प्रमाण जास्त दिसते. साठोत्तरी कालखंडात मात्र शिक्षणाची दारे सर्वांना खुली झाल्यामुळे तसेच लोकशाहीचा पुरस्कार ह्या प्रमुख दोन कारणांमुळे अनेक समाजघटक जागृत झाले आणि आपल्या प्रश्नांसाठी त्यांनी चळवळी सुरू केल्या. ह्या उपेक्षित घटकांनी चळवळींबरोबरच आपले प्रश्न आपल्या साहित्यातून मांडले. साहित्य केवळ मनोरंजनाचे साधन न राहता ते सामाजिक प्रश्नांचे व्यासपीठ बनले पाहिजे. ह्या भूमिकेतून ह्या घटकांनी लेखन केले. अनेक सामाजिक स्तर आपल्या वेदना आणि प्रश्न आपल्या साहित्यातून व्यक्त करु लागले. स्त्रियांनीही आपल्या व्यथा-वेदना साहित्याद्वारे व्यक्त केलेल्या दिसतात. साठपूर्व काव्यसंग्रहांच्या तुलनेत साठोत्तरी काव्यसंग्रह मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसतात. काही अपवाद वगळता गुणात्मक दृष्टीनेही वाढ झाली असल्याचे दिसते. साठोत्तरी कालखंडात शिक्षण, नोकरी, पारंपारिक व्यवसायामुळे स्त्रियांच्या पारंपरिक मानसिकतेत आमूलाग्र बदल होऊ लागला आणि त्याचे पडसाद स्त्रियांच्या लेखनात उमटू लागले. स्त्रीजीवनाचे सर्व संदर्भ, स्त्रीजीवनातील वाढते व नवीन ताण-तणाव ह्यांचे चित्रण साठोत्तरी मराठी कवीयत्रींच्या कवितेतून पहावयास मिळते. मराठी कवितेचे दालन समृद्ध करण्यात ह्या कवयित्रींनी फार मोठा वाटा उचललेला आहे. विशेषत: १९६० नंतरचे बदलते स्त्रीजीवन हा साठोत्तरी कवितेतील एक महत्त्वाचा भाग आहे. १९६० नंतर नव्यानेच कवितेच्या क्षेत्रात प्रवेश करून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कवितेचा ठसा एकूण मराठी कवितेवर उमटवणाऱ्या अनेक कवयित्री आहेत. त्यामध्ये अनुराधा पोतदार, सुशील पगारिया, प्रभा गणोरकर, रजनी परूळेकर, मलिका अमरशेख, अनुराधा पाटील, अरुणा ढेरे, नीरजा, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, प्रज्ञा लोखंडे, आसावरी काकडे, सुहासिनी इर्लेकर, अंजली कुलकर्णी, हेमालेले, वासंती अभ्यंकर, शैला सायनाकर, सुनंदा भोसेकर, संजीवनी खोजे, सुनीता जोशी, नीला

भागवत, पद्मिनी बिनीवाले, यशोधरा साठे, सुलभा हेर्लेकर, विजया जहागिरदार, मीना प्रभू, नीलम माणगावे, मंदा कदम आणि इतर कवयित्री. साठोत्तरी कालखंडात कवयित्रींची व काव्यसंग्रहांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.

अनुराधा पोतदार ह्यांनी प्रेमानुभव, कौटुंबिक नातेसंबंध, नोकरी व्यवसायातील अनुभव, स्त्रीमुक्ती चळवळ व स्त्रीवाद ह्या अनुषंगाने आलेले अनुभव शब्दबद्ध केले. 'आवर्त' (१९६९), 'कॅक्टस फ्लॉवर' (१९७९) व 'मंझधार' (१९८९) ह्या कवितासंग्रहांमधून आपल्या मनातील भावभावना व्यक्त केल्या. जीवन जगत असताना निर्माण झालेल्या ताणांमुळे, दडपणामुळे जे दु:ख अनुभवले, त्या दु:खांना कवितेतून त्यांनी वाट करून दिली. त्यांच्या कवितेतून स्त्रीची वेदना व्यक्त झाली आहे. त्यांच्या कवितेतील स्त्री प्रेम हे जीवनातील श्रेष्ठ मूल्य मानणारी आहे.

अनुराधा पोतदार ह्यांच्या कवितेमध्ये नोकरी-व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे जीवन फारसे आलेले नाही. मात्र त्यांच्या 'स्पर्श' या कवितेत धावपळ करून बसमध्ये चढणारी स्त्री येते. त्यांच्या कवितेत स्त्रीवादी विचार अगदी स्पष्टपणे येत नाहीत. परंतु स्त्रीवादाची जाणीव झालेली आहे, अशा खुणा पुढीलप्रमाणे दिसतात,

> ''मुक्त करीत नाही कुणीच कधीच
> मुक्त व्हावं लागतं स्वत:लाच''[६]

सुशील पगारिया ह्यांच्या 'मनवृंदावन' (१९७०), 'केसर' (१९७७), 'दीपकळ्या' (१९७३) ह्या कवितासंग्रहांमधून सफल व विफल प्रेमानुभव व्यक्त झाला आहे. तसेच विवाहसंस्थेतून येणारे अनुभव, कौटुंबिक नातेसंबंधातून येणारे अनुभव हेही व्यक्त झाले आहेत.

प्रभा गणोरकर ह्यांच्या 'व्यतीत' (१९७४), 'विवर्त' (१९८५) ह्या कविता संग्रहांमधून प्रेमानुभवाच्या विविध छटा व्यक्त झाल्या आहेत. त्यांच्या कवितेतील दु:ख अंतर्मुख करणारे आहे. प्रीतीच्या निराशेतून, दूरतेतून ते जन्मलेले आहे. गणोरकरांचे अनुभवविश्व समृद्ध आहे. त्यांच्या कवितेतून सफल प्रेमानुभावपेक्षा विफल प्रेमानुभव प्रामुख्याने व्यक्त झाला आहे.

नोकरी करणाऱ्या स्त्रीला येणाऱ्या अडचणी प्रभा गणोरकरांनी समर्थपणे मांडल्या आहेत. 'पर्सिक्यूशन' ह्या आपल्या दीर्घ कवितेत असुरक्षितपणाची भावना मोठ्या ताकदीने त्यांनी उभी केली आहे.

साठोत्तरीकाळात मोठ्या ताकदीने काव्यलेखन करणारी कवयित्री म्हणून नीरजांचे नाव घेतले जाते. 'निरन्वय' (१९८७), 'वेणा' (१९९४) हे त्यांचे कवितासंग्रह त्यांच्या 'निरन्वय' काव्यसंग्रहावर इंग्रजी वाङ्मयाचा प्रभाव दिसतो. स्त्रीची पारंपरिक भूमिका नाकारणाऱ्या निरजा ह्यांनी प्रेमाची विविधरूपे कवितेतून व्यक्त केली आहेत. मुलगा व आई ह्यांचा नातेसंबंध प्रामुख्याने नीरजा ह्यांनी आपल्या कवितेतून रेखाटला आहे.

स्त्रीवादी नवी कविता आशय व अभिव्यक्तीच्या नव्या वाटांचे दार ठोठावू लागली आहे, हे एक सुचिन्ह आहे. नीरजा ह्यांच्या कवितेतील प्रतिक्रिया केवळ स्त्री-पुरूष संबंधापुरत्या मर्यादित नाहीत; तर समाज, संस्कृती, मनुष्यजीवन व साहित्य अशा अनेक विषयांच्या संबधातील व्यापक प्रतिक्रिया व्यक्त करणाऱ्या आहेत. नीरजा ह्यांच्या कवितांमधील स्त्रीवादी विचारांविषयी जाणीव अत्यंत सखोल आहे. स्त्रीच्या वाट्याला आलेले अपमानीत करणारे दुय्यमत्व हा त्यांच्या कवितांचा केंद्रबिंदू आहे. भारतीय संस्कृतीने स्त्रीला आदर्श ठरवण्यासाठी जी मूल्ये सांगितली, ती मूल्ये नसून स्त्रीच्या स्वातंत्र्यावर घाव

घालणारी हत्यारे आहेत. स्त्रीच्या स्वतंत्र विकासाला व विचाराला अडसर ठराव्यात घातलेल्या बेड्या आहेत. म्हणून नीरजांची कविता मूल्यांची व आदर्शाची होळी करते.

ज्यांच्या कवितासंग्रहांमधून चिंतनशीलता जाणवते, ज्यांनी सुसंस्कृत, सौंदर्यवादी मनाचे अतिशय हळुवारपणे चित्रण करीत मनाचे अनेक सूक्ष्म पदर उलगडून दाखविले, त्या असावरी काकडे ह्यांचे 'आरसा' (१९९०), 'आकाश' (१९९१), 'लाहो' (१९९५) असे कवितासंग्रह आहेत. त्यांच्या काव्यसंग्रहामधून समंजस प्रियकराची इच्छा करणारी प्रियसी दिसते.

स्त्रीवादी विचारांच्या दिशा शोधण्याचा प्रयत्न आसावरी काकडे ह्यांच्या 'आरसा' (१९९०), 'आकाश' (१९९१), 'लाहो' (१९९५) ह्या कवितासंग्रहांमधून दिसतो. त्यांच्या कवितेतील स्त्री सोशीक व समंजस आहे.

स्त्री शरीराच्या जाणीवा खणखणीत, स्पष्ट शब्दात व्यक्त करणारे मराठीतील पहिले पुस्तक म्हणजे 'वाळूचा प्रियकर' (१९७९) हा मलिका अमरशेख ह्यांचे जीवनसंग्रह होय. विफल प्रेमानुभव त्यांच्या कवितेमधून अधिक स्पष्टपणे व्यक्त झाला आहे.

स्त्रीशरीर व त्याच्या जाणीवा ह्यांच्याविषयी मत व्यक्त करणाऱ्या मलिका अमरशेख ह्यांनी वेश्याजीवनाविषयी, वेश्यांच्या भणंग आयुष्याविषयी त्वेषाने आपले विचार व्यक्त केले आहेत. स्त्रीवादी जाणिवा मलिका अमर शेख ह्यांच्या कवितेत स्पष्टपणे दिसतात. प्रचंड वेगाने फरफटत चाललेले स्त्री-पुरूषांचे आयुष्य, अनिष्ट प्रथा, अस्तित्व टिकण्यासाठी द्यावा लागणारा झगडा ह्यांचे चित्र मलिकांच्या कवितेतून मोठ्या ताकदीने व्यक्त झाले आहे.

आत्यंतिक हळवेपणा व तीव्र संवेदना हे गुण प्रज्ञा लोखंडे ह्यांच्या प्रेमानुभव व्यक्त करणाऱ्या कवितेतून दिसतात. उपेक्षित समाजघटकांकडून येणारे अनुभवही त्यांच्या कवितेतून

प्रखरतेने व्यक्त झाले आहेत. फुले-आंबेडकर ह्यांच्या विचाराने प्रभावित झाल्यामुळे प्रज्ञा लोखंडे 'स्त्रीमुक्ती'साठी धडपडतात.

मलिका अमरशेख, प्रज्ञा लोखंडे ह्यांच्याप्रमाणे ज्योती लांजेवार ह्यांच्या कवितेमधून प्रेमानुभव, कौटुंबिक नातेसंबंधातील अनुभव व्यक्त झाले आहेत. साठोत्तरी मराठी कवयित्रींच्या कवितेमध्ये वेश्येच्या मातृअनुभवाला, एका उपेक्षित अनुभवाला मोठ्या ताकदीने व उत्कटपणे ज्योती लांजेवार ह्यांनी व्यक्त केले आहे. स्त्रीवादी विचारही त्यांनी मोठ्या ताकदीने व्यक्त केले आहेत. ज्योती लांजेवार ह्यांच्या कवितेतील विचार हे केवळ दलित कवयित्रीचे नसून समस्त स्त्रीजीवनासंबंधीचे आहेत. जातीयता तिला स्वस्थ बसू देत नाही. जुलूम, अन्याय, अत्याचार, लुटालूट, जाळपोळ, बलात्कार अशा अनेकांच्या विरुद्ध बंड उभारायला ती सरसावते.

जाणीवपूर्वक वेगळ्या मार्गाने जाणारी; प्रौढ, समंजस व चिंतनशील अशी कविता लिहिणाऱ्या अनुराधा पाटील ह्यांचे 'दिगंत' (१९८१), 'तरीही' (१९८४), 'दिवसेंदिवस (१९९२) हे कवितासंग्रह होत. त्यांच्या कवितेतून सफल व विफल प्रेमाचे भावविश्व व्यक्त झाले आहे. विफल प्रेमाचे जीवघेणे दु:ख त्यांच्या कवितेतून दिसते.

अनुराधा पाटील ह्यांच्या कविता सर्वार्थाने वेगळ्या आहेत. त्यांच्या कवितेतील भावविश्व प्राधान्याने प्रेमानुभवाशी निगडीत आहे. त्यांची कविता प्राधान्याने आत्मनिष्ठ व आत्मकेंद्री आहे. त्यांच्या कवितेत स्त्रीमनाचे एक वेगळे चिंतनशील रूप पहायला मिळते. जीवनातील दु:खाचा तीव्र वेध घेण्याची ताकद तिच्यात आहे.

साठोत्तरी मराठी कवयित्रींच्या ह्या वाटचालीत सुहासिनी इर्लेकर, पद्मिनी बिनीवाले, अंजली ठकार, हिरा बनसोडे, रजनी परुळेकर तसेच माधवी देसाई, संगीता जोशी, संजीवनी

खोजे, पद्मा लोकूर, विजया जगहागिरदार, मंदा कदम, नीलम माणगावे, शैला सत्यनाकर, वैशाली नायकवडे, वासंती अभ्यंकर, लीला गोविलकर, जयश्री खारकर, विजया नेरूरकर, श्रद्धा पराते, रजनी कुट्टी, अंजली जोशी, मीनाक्षी डोणे, रजनी हिरळीकर, मीना प्रभू, नीला भागवत, सुलभा हेर्लेकर, अंजली कुलकर्णी इत्यादी कवयित्रींच्या कवितांमधून घराचा आदिबंध, स्त्री-पुरुष संबंध, स्मृतिजीवनाचे संवेदन, अंत:स्थाचे संवेदन, देशीयतेचे भान, महानगरीय संवेदना, १९६० नंतरच्या स्त्रीजीवनाचे बदलते स्वरूप, स्त्रीजीवनाचे विविधांगी जीवन अनुभव प्रामुख्याने प्रेमानुभव, विवाहसंस्थेतून येणारे अनुभव, कौटुंबिक नातेसंबंधातून येणारे अनुभव, उपेक्षित समाजघटकांकडून येणारे अनुभव, स्त्रीवादी जाणिवा व्यक्त झाल्या आहेत.

१९६० नंतर नव्यानेच कवितेच्या क्षेत्रात प्रवेश करून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कवितेचा ठसा एकूण मराठी कवितेवर उमटवणाऱ्या अश्विनी धोंगडे ह्या महत्त्वपूर्ण कवयित्री होत. विशेषत: 'स्त्रीसूक्त' (१९८८) व 'अन्वय' (१९९२) ह्या आपल्या पहिल्या दोन कवितासंग्रहांमधून त्यांनी 'स्त्रीजीवन' ह्या एकाच विषयावर काव्यलेखन केले आहे. तसेच स्त्रीजीवनाचे अनेक पदर उलगडले आहेत. त्यातून विविधांगी स्त्रीजीवन अविष्कृत झाले आहे.

## २.४. समारोप :

मराठी कवितेची मराठी वाङ्मयाच्या प्रारंभापासून सुरू असलेली वाटचाल आजपर्यंत यशस्वीपणे चालू आहे. ह्या प्रदीर्घ वाटचालीमध्ये मराठी कविता विविधांगाने बहरली, फुलली आणि समृद्ध झाली. संतकवींची भक्तिमार्गी कविता, पंडितांची कथात्मक व आख्यानात्मक कविता आणि शाहिरांचे 'लावणी' व 'पोवाडा' हे काव्यवाङ्मय ह्यांनी मध्ययुगीन मराठी

साहित्य समृद्ध केले. त्यानंतर इंग्रजी काव्याच्या प्रभावाने मराठीत आधुनिक काव्य निर्माण झाले. केशवसुतांच्या संप्रदायातील कवींनी स्वच्छंदवादी (सौंदर्यवादी) काव्य समृद्ध केले. त्यानंतरच्या रविकिरण मंडळातील कवींनी त्यात मोलाची भर घातली. इंग्रजी काव्याच्या प्रभावाने हे आधुनिक मराठी काव्य निर्माण झाले. १९४५ नंतर मर्ढेकरांनी सुरु केलेल्या नवकवींच्या संप्रदायातील कवी, १९६० नंतर दलित कवी आणि ग्रामीण कवी ह्या सर्व कवींनी नवे प्रवाह आणून मराठी काव्य समृद्ध केले. एकूण मराठी कवितेच्या वाटचालीत प्रारंभापासून आजपर्यंत कवयित्रींचे योगदान महत्त्वपूर्ण उल्लेखनीय असे आहे.

जुनी, समृद्ध व संपन्न अशी मराठी कवयित्रींची काव्यलेखनाची परंपरा आहे. अनेक स्त्रियांनी संतकाव्यालेखन केले आहे. परंतु पंडिती व शाहिरी काव्यलेखन मात्र स्त्रियांनी केल्याचे निदर्शनास येत नाही. ह्या मध्ययुगीन कालखंडात महदाइसा, नागाइसा, हिराइसा, कामाइसा, पोमाइसा, ध्यानाइसा, मुक्ताबाई, जनाबाई, गोणाई, आऊबाई, लिंबाई, लाडाई, सोयराबाई, निर्मळा, भागू, कान्होपात्रा, बहिणाबाई, वेणाबाई, प्रेमाबाई, बयाबाई, गंगाबाई, कर्माबाई, विठाबाई, राधाबाई, चिमा, जानकी, पार्वतीबाई, रेणूका, मैना, मुक्ताई, संतुबाई अशा कितीतरी कवयित्री निर्माण झाल्या.

एकोणीसाव्या शतकाच्या सुरवातीला समाजात प्रचंड उलथापालथ झाली. काव्यक्षेत्रातही उल्लेखनीय उलाढाली झाल्या. माणूस हा जीवनव्यवहाराचा केंद्र मानला गेला. ह्यातूनच माणूस, समाज, निसर्ग, ईश्वरीयसत्ता, ह्यांच्यातील परस्परसंबंधाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न मराठी कविता करू लागली. मराठी कवितेत जी स्थित्यंतरे झाली, त्यांचे पडसाद समकालीन स्त्रियांच्या कवितेवर फारसे उमटल्याचे दिसत नाहीत. त्यांच्या कविता घराच्या

चार भिंतीच्या पलीकडे जाऊ शकल्या नाहीत, पती देवदेवता, व्रत-वैकल्य, नवस-सायास ह्यांनीच हे जग भरले होते.

अर्वाचीन कालखंडात सावित्रीबाई फुले, लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई चौधरी ह्यांनी आपले काव्यलेखन केले. मनोरमाबाईंच्या काव्याचा विचार केला, तर त्यांच्या काव्यपिंड निसर्गवेडा होता असे दिसते. संजीवनी मराठे ह्यांच्या कविता रविकिरण मंडळाच्या कवितेच्या वळणाच्या असून त्यातून प्रेमाची विविधरूपे साकार झाली आहेत. शांता शेळके ह्यांनी सातत्याने काव्यलेखन केले असून त्यांनी कोळीगीते, लावणीगीत, नाट्यगीत, भावगीत असे अनेक काव्यप्रकार हाताळले आहेत. इंदिरा संतांच्या कवितेतून पतिविरहाचे दु:ख प्रामुख्याने व्यक्त झाले आहे.

पद्‌मा गोळे ह्यांच्या कवितेतून स्त्रीप्रेमाची विविध रूपे व्यक्त झाली असून स्त्रीजीवनाविषयीचे पुरोगामी विचार, स्त्रीजीवनातील दु:खे व्यक्त झाली आहेत. शिरीष पैंच्या कवितेतून निसर्ग व प्रेमाची विविध रूपे व्यक्त झाली आहेत. त्यांनी 'हायकू' सारखा काव्यप्रकार हाताळून आपली प्रयोगशीलता दाखविली आहे.

थोडक्यात, मराठी कवयित्रींच्या १९६० पूर्वीच्या कवितांमधून हे लक्षात येते की, घर-संसार, पती-मुले, प्रेम हे अनुभवविश्व अनेक कवयित्रींच्या कवितेमध्ये आलेले आहेत. संत जनाबाई, सावित्रीबाई फुले, लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई चौधरी, संजीवनी मराठे, इंदिरा संत, पद्‌मा गोळे, शांता शेळके ह्या कवयित्रींच्या कवितांमधून स्त्रीजीवनाविषयीचे विचार व्यक्त झाले आहेत. तसेच स्त्री केवळ भोगदासी नसून ती माणूस आहे, माणूस म्हणून स्वत:च्या अधिकाराने जगण्याचा तिला हक्क आहे, अशा हक्कांची, अधिकारांची स्वकर्तृत्वाची जाणीव तिला झाल्याचेही ह्या कवितांमधून जाणवते.

साठोत्तरी मराठी कवयित्रींच्या कवितांचा अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते. ती ही की, कवयित्रीची व काव्यसंग्रहांची वाढ ही प्रचंड प्रमाणात झाली आहे. त्यांचे अनुभवविश्वही विस्तारलेले आहे. साठपूर्व कवयित्रींच्या कवितेपेक्षा साठोत्तरी कवयित्रींच्या कवितेत प्रेमानुभव अधिक धीटपणाने व्यक्त झालेला आहे.

अनुराधा पोतदार ह्यांच्या कवितेतून प्रेमानुभव कौटुंबिक नातेसंबंध, नोकरी-व्यवसायातील अनुभव, तसेच स्त्रीमुक्ती चळवळ व स्त्रीवाद या अनुषंगाने आलेले अनुभव व्यक्त झाल्याचे स्पष्ट दिसून येते. सुशीला पगारिया, प्रभा गणोरकर, नीरजा ह्यांचा कवितांमधून प्रामुख्याने प्रेमानुभव, विवाहसंस्थेतून येणारे अनुभव, कौटुंबिक नातेसंबंध, नोकरी-व्यवसायातील अनुभव तसेच स्त्रीमुक्ती चळवळ व स्त्रीवादी जाणिवा व्यक्त झाल्या आहेत. सासरी जाणाऱ्या मुलीचे, तिच्या सासुरवासाचे दु:ख सुशील पगारीया ह्यांच्या कवितेत दिसते. विधवांच्या दु:खाला वाचा फोडण्याचा प्रयत्न आसावरी काकडे ह्यांनी अधिक सखोलपणे व मार्मिकपणे केला आहे. प्रभा गणोरकर, नीरजा, प्रज्ञा लोखंडे ह्यांच्या कवितेत सती जाणाऱ्या स्त्रीचा अनुभव व्यक्त झाला आहे. अर्थात ह्या अनुभवाला उपरोधाची तीव्र धार आहे.

विवाहसंस्थेतून येणारे अनुभव साठोत्तरी मराठी कवयित्रींच्या कवितेतून अगदी कमी प्रमाणात व्यक्त झाले आहेत. कवयित्रींची संवेदशीलता प्रेमाच्या बाबतीत जितकी तीव्र आहे, तेवढीच तीव्र संवेदनशीलता विवाहसंस्थेतून येणऱ्या अनुभवसंदर्भात असायला हवी होती. स्त्रीचे दु:ख स्त्रीच अधिक जाणू शकते, ह्या दृष्टीने पाहिले, तर स्त्रीच्या दु:खांना वाचा फोडण्याचे प्रयत्न कवितेतून अधिक प्रमाणात व्हायला हवे होते. परंतु तसे व्यक्त झाल्याचे दिसत नाही. विवाहसंस्थेतून येणारे प्रौढकुमारीकांचे जीवन, सवतीचे जीवन, परित्यक्ता व

विधवा ह्यांचे जीवन, सती जाणाऱ्या स्त्रीचे अनुभव ह्या विषयांना कवयित्रींनी थोड्याफार प्रमाणात स्पर्श केला आहे. ह्या प्रश्नांना कवितेतून स्थान देण्याचा अल्पसा प्रयत्न तरी करू लागल्या आहेत, हे मात्र आपण मान्य करायला हवे.

कौटुंबिक नातेसंबंधातून येणारे अनुभवामध्ये 'आई' ह्या नातेसंबंधाविषयी लिहिलेल्या कविता भरपूर आहेत. त्यातून विविध भावना व्यक्त झाल्या आहेत. ह्या कवितांमधून केवळ मातृत्वाची स्तोत्रे गायीली नाहीत, तर त्यातून मातृत्व, स्त्रीत्व, मातृत्वाचा वारसा, सांस्कृतिक परंपरा ह्यांचा प्रत्यय येतो. परंपरागत सोशीकता, त्याग, व्यथा-वेदना ह्या अनुभवांबरोबर आईपणाची उपेक्षाही व्यक्त झाली आहे. प्रज्ञा लोखंडे ह्यांच्या कवितेत मुलगा हा आईच्या सुखासाठी धडपडताना दिसतो. अनुराधा पाटील ह्यांच्या कवितेत अपत्यविरहाचे दु:ख दिसते. तर इतर कवयित्रींच्या काव्यातून मुलांच्या सुखासाठी धडपणारी, कष्ट करणारी आई दिसते. ज्योती लांजेवार ह्यांच्या कवितेतून वेश्या असलेल्या मातेचा अनुभव व्यक्त होतो. समाजातील वास्तव परिस्थिती रेखाटण्याचा प्रयत्न येथे दिसतो. मुलगा व आई ह्यांच्यातील नातेसंबंध प्रभा गणोरकर, नीरजा ह्यांच्या कवितेतून व्यक्त झाला आहे. कुटुंबात असूनही एकाकीपणाचा अनुभव कुटुंबकर्त्या स्त्रीला येतो आहे. त्यातूनच नातेसंबंधाविरुद्ध तिचे मन बंड करून उठते आहे. असा अनुभव अनुराधा पाटील, नीरजा ह्यांच्या कवितेतून येतो. असावरी काकडे, ज्योती लांजेवार ह्यांच्या कवितेतून एका विशिष्ट नातेसंबंधाविषयी विचार व्यक्त न होता सरसकट नातेसंबंधाविषयी ढोबळ मानाने विचार व्यक्त झाला आहे. 'आई' हा नातेसंबंध वगळता इतर नातेसंबंधाविषयी अनुभव कमी प्रमाणात व्यक्त झाले आहेत. भाऊ-बहिण, बहीणी-बहिणी, नणंद-भावजय, सासू-सून, मुलगा-वडील अशा कितीतरी नातेसंबंधांना कवयित्रींना कवितेत व्यक्त करता आलेले नाही, असे स्पष्ट दिसते.

नोकरी-व्यवसायातील अनुभव अनुराधा पोतदार, प्रभा गणोरकर ह्यांच्या कवितेतून थोड्या प्रमाणात व्यक्त झाले आहेत. तसेच मलिका अमर शेख, प्रज्ञा लोखंडे, ज्योती लांजेवार ह्यांच्या कवितेतील दु:ख उपेक्षित जातिसंस्थेतून आले आहे. ज्योती लांजेवार ह्यांच्या कवितेतून हे दु:ख स्त्री म्हणून व दलित स्त्री म्हणून अशा दुहेरी स्वरूपात व्यक्त झाले आहे. मालिका अमर शेख व ज्योती लांजेवार ह्या कवयित्रींनी वेश्याव्यवसायातील स्त्रियांच्या दु:खाची कोंडी फोडली आहे.

१९७५ नंतर मराठी काव्यात स्त्रीमुक्ती चळवळीची लाट आल्याचे दिसते. अनुराधा पोतदार, सुशील पगारिया, आसावरी काकडे, अनुराधा पाटील, मलिका अमरशेख, ज्योती लांजेवार, नीरजा, प्रज्ञा लोखंडे आदी कवयित्रींनी स्त्रीवादी दृष्टीकोनातून स्त्रीजीवनानुभव सांगण्याचा प्रयत्न केला. ह्या सर्व कवयित्रींमध्ये स्त्रीवादाचे विचार ठामपणे व्यक्त झाले आहेत. तसे इतर कवयित्रींच्या कवितेत दिसत नाहीत. साठोत्तरी कवयित्रींची संख्या व त्यांच्या काव्यसंग्रहांची संख्या लक्षात घेतली, तर स्त्रीवादी दृष्टिकोनातून लेखन करणाऱ्या कवयित्री कमी दिसतात. त्यामुळे स्त्रीवादी विचार मराठी कवितेत पुरेसा रुजलेला दिसत नाही, असे वाटते.

★★★

## २.५. संदर्भ व टीपा

(सूचना : जेथे आवृत्तीचा उल्लेख नाही, तेथे प्रथमावृत्ती समजावे)


१. पहा : खोले विलास, प्रस्तावना, ताराबाई शिंदे लिखित 'स्त्रीपुरुषतुलना', संपादक स्वत: खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७, पृ. १६

२. पहा : माळी मा. गो. (संपादक), संपादक मनोगत, 'सावित्रीबाई फुले : समग्र वाङ्मय'

३. जाधव रा. ग., 'आधुनिक मराठी कवयित्रींची कविता' प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९६, पृ. ५

४. पहा : मराठे संजीवनी, 'संजीवनी' (संपादक भालचंद्र खांडेकर), अनमोल प्रकाशन, पुणे, १९७६, पृ. ७६.

५. पहा : पुंडे दत्तात्रय, 'ललित', मुंबई, सप्टेंबर १९९०, पृ. ३८.

६. पोतदार अनुराधा, 'कॅक्टस फ्लॉवर', मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९७९, पृ. ३५.